ग्रामपंचायतींचे रुपांतर नगरपंचायत/ नगरपरिषदेमध्ये झाल्यानंतर शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत घरकुल बांधकामासंदर्भात करावयाच्या कार्यवाहीबाबत.

**महाराष्ट्र शासन**
आदिवासी विकास विभाग,
शासन परिपत्रक क्रमांक : आविवि-२०१७/प्र.क्र.२१७ /का.१७
हुतात्मा राजगुरु चौक, मादाम कामा मार्ग,
मंत्रालय, विस्तार भवन, मुंबई-४०० ०३२.
दिनांक :- १ जुलै, २०१७.

वाचा :- शासन निर्णय, आदिवासी विकास विभाग क्र.घरकुल-२०१६/ प्र.क्र.३७ /का.१७, दि. १५ मार्च, २०१३.

शासन परिपत्रक :-

राज्यात तालुक्याच्या ठिकाणच्या ग्रामपंचायतींचे नगरपंचायत/नगरपरिषदेमध्ये रुपांतर झाले आहे. त्यामुळे शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत मंजूर केलेल्या घरकुलांबाबत कार्यवाही करणे अडचणीचे झाले आहे. त्यामुळे शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत घरकुल बांधकामा संदर्भात सर्व संबंधितांनी खालीलप्रमाणे कार्यवाही करावी.

१) शबरी आदिवासी घरकुल योजनेंतर्गत घरकुल ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये होण्यापुर्वी लाभार्थ्यास प्रथम मान्यता देणेत आली आहे. परंतु लाभार्थ्यांने घरकुल बांधकामास सुरुवात केली नसल्यास लाभार्थ्यास पंचायत समितीव्दारे घरकुल पुर्ण करुन द्यावे.

२) एखाद्या ग्रामपंचायतीचे रुपांतर नगरपंचायतीमध्ये होण्यापुर्वी लाभार्थ्यांना मंजुरी दिली आहे व पहिला हप्ता वितरीत करण्यात आला असेल तर सदर लाभार्थ्यांनी घरकुलांचे बांधकाम सुरु केलेले असल्यामुळे संबंधित लाभार्थ्यांना पुढील निधी वितरणाची प्रक्रिया चालू ठेवावी तसेच अशा ठिकाणची काम पुर्वी ज्या तालुक्यामध्ये संबंधित गाव होते त्या तालुक्याचे गटविकास अधिकारी यंत्रणा व नव्याने नेमण्यात आलेले रुरल इंजिनिअर यांच्या सेवा उपलब्ध करुन देण्यात याव्यात.

३) ज्या ग्रामपंचायतीचे नगरपंचायत/नगरपरिषद मध्ये रुपांतरण झालेले आहे अशा ठिकाणी नगरपरिषदेमध्ये रुपांतरण झाल्यानंतर जिल्हास्तरावरुन मंजुरी देण्यात येऊ नये व

घरकुलांना बांधकाम सुरु करण्याची परवानगी देण्यात येऊ नये. याबाबत संबंधित नगरपंचायत/नगरविकास विभागास पुढील कार्यवाहीसाठी अवगत करावे.

२. उपरोक्त सुचनांची काटेकोर अंमलबजावणी करण्यात यावी.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

(गजानन रा.देशमुख)
कार्यासन अधिकारी,महाराष्ट्र शासन

प्रति,

सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी/मुख्य अधिकारी सर्व जिल्हा परिषद/नगरपंचायत/ नगरपरिषद, महाराष्ट्र राज्य.

प्रत,

मा. मुख्यमंत्री यांचे अपर मुख्य सचिव, मंत्रालय, मुंबई -३२
मा. मंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
मा. राज्यमंत्री, आदिवासी विकास यांचे खाजगी सचिव
अपर मुख्य सचिव (वित्त), वित्त विभाग, मंत्रालय, मुंबई-३२
प्रधान सचिव, नगरविकास विभाग यांचे स्वीय सहाय्यक
सचिव, ग्राम विकास व जलसंधारण विभाग, बांधकाम भवन, फोर्ट, मुंबई
आयुक्त, आदिवासी विकास,महाराष्ट्र राज्य, नाशिक
सर्व जिल्हाधिकारी,
सर्व मुख्य कार्यकारी अधिकारी, जिल्हा परिषद
अपर आयुक्त, आदिवासी विकास, ठाणे, नाशिक, अमरावती, नागपूर
संचालक,राज्य व्यवस्थापन कक्ष-ग्रामीण गृहनिर्माण, सिडको भवन, सीबीडी बेलापूर,नवी मुंबई
सर्व प्रकल्प संचालक,जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणा
सर्व प्रकल्प अधिकारी, एकात्मिक आदिवासी विकास प्रकल्प,
निवड नस्ती-कार्यासन १७,